**दिनांक -- 29/11/22**
**विषय : पत्रकार नगर पुनर निर्माण प्रक्रियेत बिल्डर्स च्या शॉर्ट लिस्टिंग चे निकष विषद करण्या साठी संस्था सभासदांचा 26/11/22 चा मेळावा.**

21/11/22 ला कळविल्या प्रमाणे संस्थे ची पंच समिती, आपले पुनर निर्माण सल्लागार आणि संस्थे चे सभासद तसेच त्यांच्या कुटंबियांचा एक मेळावा संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात 26/11/22 रोजी पार पडला. ह्यात संस्थे चे सभासद आणि कुटुंबीय मिळून 87 लोकं उपस्थित होते.

ह्या मेळाव्यात सल्लागारांनी, दिनांक 3/11/22 ला पंच समिती बरोबर 19 बिल्डर्स कडून आलेल्या प्राथमिक स्वरूपच्या ऑफर्स संबंधी झालेली चर्चा तसेच त्या तून बिल्डर्स ची शॉर्ट लिस्टिंग कशी करण्यात यावी, ह्या संबंधात पुढची वाटचाल कशी होणार ह्या वर प्रकाश टाकला. ह्या संबंधात कुठले निकष लावण्यात  आले आहेत ते ही स्पश्ट केले. ह्या प्रक्रियेत आपण 19 वरून 10 बिल्डर्स ला कसे शॉर्ट लिस्ट केले हे सर्वांना समजाऊन सांगितले. ह्या मीटिंग मधे ही शॉर्ट लिस्टिंग ची प्रक्रिया पुढे ही कशी राबवली जाईल जेणे करून संस्था 3 सर्वोत्तम पर्यायांचा (बिल्डर्स) विचार करण्या पर्यंत येईल हे ही ठरविन्यात आले . ह्या संबंधात सगळी माहिती सभासदांकडे असावी म्हणून त्या संबध्यातल्या स्लाईड्स ह्या विवेचना सोबत जोडल्या आहेत.

जे 10 बिल्डर्स शॉर्ट लिस्ट केले गेले आहेत त्यांना 12,13 आणि 14 डिसेंबर ला आपले सल्लागार, पंच समित सदस्य आणि काही निवडक सभासदांना समोर त्यांनी दिलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या ऑफर्स वर सविस्तर चर्चा करण्या साठी प्रत्यक्ष इंटरव्ह्यू ला बोलाविण्याचे ठरवण्यात आले.

सल्लागारांनी तसेच संस्थे चे सचिव श्री पटवर्धन यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरं दिली.

आपल्या संस्थे चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**Pradeep Newalkar**
**Patrakar Nagar**